# मराठीचे अध्यापन आणि कवितेचे अध्यापन कौशल्य

# Teaching Marathi and skills of teaching poetry

प्रा.डॉ. सौ वीरा पवन मांडवकर
सहायक प्राध्यापक
इंदिरा महाविद्यालय, कळंब, जि.यवतमाळ

## गोषवारा

कोणत्याही अध्यापनात बौद्धिक घटक महत्त्वाचा मानण्यात येतो, पण साहित्याच्या अध्यापनात विद्‌यार्थ्यांच्या अंतःकरणप्रवृत्ती व सवेदनशीलता जागृत करणे महत्त्वाचे असते. साहित्यकृतीच्या गाभ्यापर्यंत पोचायचे असेल तर विद्‌यार्थ्याच्या संवेदनशीलतेशिवाय अध्यापक काहीही करू शकत नाही. ही संवेदनीशीलता प्रत्येकाजवळ उपजतच असते. पण ती संवर्धित आणि समृद्ध करण्याचे काम प्राध्यापकालाच करावे लागते. संवेदना ही मानसिक प्रक्रिया आहे. ती व्यक्तिमत्त्वाशी निगडित असते. कोणाला कोणती गोष्ट भावते, कोणती त्याच्या अंतःकरणापर्यंत पोचते, हे ज्याच्या त्याच्या वृत्तीधर्मावर अवलंबून असते. साहित्याचे अध्यापन करणाऱ्यांना समोरील विद्‌यार्थ्यांची आस्वाद धारणा व अभिरुचीची घडण सदैव लक्षात घ्यावी लागते. साहित्येतर विषयाच्या अध्यापनात या गोष्टींना विशेष प्राधान्य देण्याची आवश्यकता नसते.

## Abstract:

In any teaching, the intellectual component is considered important, but in the teaching of literature, it is important to awaken the instincts and sensitivities of the students. A teacher can do nothing without the sensibility of the student if he wants to get to the core of a literary work. This sensitivity is inherent in everyone. But the work of cultivating and enriching it has to be done by the professor. Sensation is a mental process. It is related to personality. What one feels, what reaches one's heart, depends on one's attitude. Those who teach literature always have to keep in mind the perception of taste and the formation of taste of the students in front of them. There is no need to give special priority to these things in the teaching of non-literary subjects.

बीजशब्द :
मराठी साहित्य, समीक्षा, अध्यापन, व्यक्तिमत्व, सौंदर्य, आकलन, कविता, लय, शब्दोच्चार

## साहित्यकृती आणि व्यक्तिमत्त्वः—

साहित्याच्या अध्यापनाला दोन गटात विभाजित करता येईल. एक गट सर्जनशील साहित्याचा व दुसरा समीक्षा आणि वैचारिक वाङ्मयाचा गट. सर्जनशील साहित्याच्या अध्यापनाचा विचार केला तर कथा, कविता, नाटक, कादंबरी अशा वाङ्मयप्रकारातील विशिष्ट साहित्यकृतीचे अध्यापन भिन्न भिन्न स्तरावर करावे लागते. साहित्याच्या अध्यापनात व्यक्तिमत्त्वाचा विचार करताना खालिल गोष्टी विचारात घ्याव्या लागतात.

१ लेखकाचे व्यक्तिमत्त्व
२ अध्यापकाचे व्यक्तिमत्त्व
३ विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व

लेखकाचे व्यक्तिमत्त्व समजावून घेत असताना त्याने निर्माण केलेल्या साहित्यकृतीचेही एक व्यक्तिमत्त्व असते हे विसरून चालणार नाही. साहित्याच्या स्वरूपाशी ते संबद्ध असते. त्याचा परस्पराशी सबंध कसा जुळवून घ्यायचा आणि आकलनाच्या दृष्टीनेही तो किती आवश्यक आहे ते अध्यापकाने स्पष्ट करणे जरुरीचे आहे. 'लेखकाच्या व्यक्तिमत्त्वात त्याची पूर्वपरंपरा, त्याची एकंदर साहित्यनिर्मिती, त्याची जीवनदृष्टी, त्याची साहित्यिक वैशिष्ट्ये, प्रस्तुत साहित्यकृतीतील त्यांचे प्रतिबिंब यांचा समावेश करून मग त्या साहित्यकृतीचे आशयानुगामी विवेचन, आविष्कारसौंदर्य, शब्दार्थांचे व प्रतिमांचे स्पष्टीकरण व अनुषंगिक संदर्भांची उकल वगैरेंचा परामर्श घ्यावा लागतो.' [१] लेखकाचे व्यक्तिमत्त्व आणि अध्यापकाचे व्यक्तिमत्त्व यांचा सांधा जुळला तर साहित्याला व्यक्तिगत आकलनाच्या पातळीवर पाहोचता येईल. पण

अध्यापनकार्यात ते विद्यार्थ्यांच्या पातळीवर पोहोचणे हे अंतिम उद्दीष्ट असते त्यासाठी विद्यार्थ्यांचेही व्यक्तिमत्त्व अध्यापकास लक्षात घ्यावे लागते. हे काम अधिक गुतागुतीचे असते. कारण विद्यार्थी हे वेगवेगळ्या स्वभावांचे, वेगवेगळ्या कौटुंबिक पार्श्वभूमीचे आणि वेगवेगळ्या आकलन, संवेदनशीलतेचे असतात. संमिश्र अशा या विद्यार्थ्यांचे एक स्वतंत्र व्यक्तिमत्त्व असते. त्या सगळ्याचा मेळ घालून विद्यार्थ्याला अध्यापन करण्याची किमया अध्यापकाला साधावी लागते.

## अध्यापन प्रक्रियेतील समस्या :—

अध्यापन प्रक्रियेतील समस्यांची जाणीव करून घ्यायची असेल तर काही सूत्रे लक्षात घ्यावी लागतील. पहिले म्हणजे अध्यापक व विद्यार्थी तेच पण साहित्यकृती वा लेखक बदलला, दुसरे म्हणजे विद्यार्थी व साहित्यकृती वा लेखक तेच पण अध्यापक बदलला, तिसरे म्हणजे अध्यापक व साहित्यकृती वा लेखक तेच पण विद्यार्थी बदलले याशिवाय अजूनही काही बदलांची शक्यता गृहित धरून काही समस्या उद्‌भवतात.या समस्या म्हणजे

१ एकच साहित्यकृती भिन्न भिन्न वर्गांना म्हणजेच स्तरांना शिकवताना कोणत्या घटकांना प्राधान्य द्यावे.

२ अध्यापक, साहित्यकर्ता, विद्यार्थी यांच्या वेगवेगळ्या व्यक्तिमत्त्वांचा मेळ कसा घालावा, विशेषत: विद्यार्थ्यांचा आकलनाचा स्तर व अध्यापकाची आकलनक्षमता यांचा मेळ कसा घालायचा?

३ साहित्यककृतीमध्ये वस्तुनिष्ठ प्रश्न विचारणे कितपत योग्य आहे?

४ अक्षरसाहित्य वा श्रेष्ठ साहित्याच्या संदर्भातच अभ्यासार्थ निवडलेल्या साहित्यकृतीचे मूल्यमापन करणे रास्त ठरेल काय? अशा अनेक समस्या अध्यापनकार्य करताना उद्‌भवू शकतात. या सर्व समस्या लक्षात घेऊन, त्यातून योग्य असा राजमार्ग काढून अध्यापन जास्तीतजास्त प्रभावी कसे करता येईल, यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे.

## कवितेचे अध्यापन :—

मराठीच्या अध्यापनात सर्वात महत्त्वाचा आणि वेगळेपण असणारा घटक म्हणजे कवितेचे अध्यापन होय. इतर कोणत्याही विषयात कवितेच्या अध्यापनाचे कौशल्य दिसून येणार नाही. 'प्रत्येक भाषेची विशिष्ट प्रकृती, त्यातील शब्दभांडार, वाक्‌प्रचार, वाक्यरचना प्रकार, नादमाधुर्य, व्याकरणविषयक दृष्टिकोण, इत्यादी तपशीलावर अवलंबून असते. प्रत्येक भाषेला इतर भाषांहून भिन्न असा एक लय असतो व तो त्या भाषेचा मातृभाषा म्हणून उपयोग करणाऱ्यांनाच माहिती असतो.'[२] म्हणूनच मराठीचे अध्यापन करताना मराठी भाषेचा सर्वार्थाने अभ्यास झालेला असल्यास अध्यापन सखोल आणि ज्ञानदायक होईल.कवितेमध्ये तर भाषेची लय अधिकच महत्वपूर्ण आहे. कवितेचे अध्यापन याविषयी माहिती देताना सर्वप्रथम हे समजून घेतले पाहिजे की, कविता ही कोणत्या वर्गाला शिकविली जात आहे. पदवीपूर्व आणि पदव्योत्तर वर्गांना केल्या जाणाऱ्या मराठीच्या अध्यापनाचा येथे विचार केला गेला आहे. विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या कवींची एखादी कविता शिकवायची असेल किंवा एकाच कवीचा संपूर्ण कवितासंग्रह शिकवायचा असेल तर त्यांचे अध्यापन काही प्रमाणात वेगळे होऊ शकते. तरीही काही प्रमाणात साम्य ठेवून आपण दोन्ही प्रकारातील विद्यार्थ्यांना अध्यापन करू शकतो. पदवी किंवा पदव्योत्तर अशा दोन्ही स्तरावर अध्यापन करताना कवितेचे भाषेच्या दृष्टीने इतर साहित्यप्रकारांपसून असलेले भाषेचे वेगळेपण समजून घेण्याची आणि कवितेतून प्रकटणारी 'कवीच्छा' समजून घेण्याची काही कौशल्ये शिकवता येतील.

## भाषिक दृष्टीने कवितेचे अध्यापन :—

प्रत्येक साहित्यकृती ही एक भाषिक रचना असते. कवितेमध्ये तर ही भाषिक रचना विशेष कौशल्याने वापरली जाते. तेव्हा तिच्या रचनेची काही तत्वे, तिच्या रचनेचे काही अवयव समजावून घेण्याची कौशल्ये विद्यार्थ्यांना दोन स्तरावर शिकविली गेली पाहिजे. कवितेची भाषिक रचना जर सुरुवातीच्या स्तरावर शिकविली गेली, तर पुढे कवितेतून आशय व सौंदर्य स्वीकारण्याच्या अनेकविध शक्तींचा विचार कसा करावा, हे अध्यापकाला दुसऱ्या स्तरावर शिकवता येईल. व्याकरण शिकणे आणि शब्दशक्ती शिकणे या दोन्ही कौशल्यांच्या आधारे कविता शिकविली जाऊ शकते. वैयक्तिक, सामाजिक, व्यावहारिक विनिमयासाठी साधन म्हणून वापरले जाणारे शब्द आणि कवितेमध्ये अनुभुतींचे अंग म्हणून येणारे श्शब्द यामध्ये अंतर आहे. हेच विद्यार्थ्याला समजावून सांगताना अध्यापकाला या गोष्टीचे प्रथम भान ठेवणे आवश्यक आहे. काव्यभाषेचे वेगळेपण, तिच्यातील अर्थप्रवाहीपणा यांचा योग्य तो समन्वय साधून अध्यापक अध्यापन करेल तर ते नक्कीच प्रभावी ठरेल.

## प्रयोगशीलता :—

कवितेचे अध्यापन करताना अध्यापकाने नवनविन प्रयोग करून अध्यापनात रंजकता आणली पाहिजे. एकच शब्द जेव्हा व्यवहारभाषेत व कवितेत वापरले जातात. तेव्हा काय व कसा फरक पडतो, याचे विद्यार्थ्यासमोर त्याने प्रयोग करून पाहिले पाहिजे. व्यवहारक्षम अर्थवाहक स्थूल शक्तिपेक्षा कवीची नजर शब्दाच्या अनुभूती आकारित करण्याच्या विशिष्ट शक्तीकडे कशी असते हे त्याने विद्यार्थ्यांना उदाहरणांच्या साह्याने शिकवले पाहिजे. खरेतर अशी अशी विशिष्ट शक्ती खुद्द कवीच त्या त्या श्शब्दाला प्राप्त करून देत असतो. त्यासाठी तो काही नवनवीन प्रयोग करतो. यातले काही प्रयोग व्याकरणविषयक असतात. तर काही शब्दशक्तीविषयक असतात. कधीकधी कवी वाक्याच्या रचनेचेच नेहमीच्या रूढ गद्यशैलीपेक्षा वेगळे प्रयोग करतो. कधी काही शब्द केवळ एकत्र आणून नवेच रसायन तयार करतो. अशा प्रयोगशीलतेमुळे विद्यार्थ्याला शब्दशक्तीचे विविधप्रकारे ज्ञान मिळू शकते.

## शब्दोच्चारांचे महत्त्व :—

भाषा ही बोलली जाते. ती नादमय असते. विद्यार्थ्याला हे सांगितल्या गेले पाहिजे की, नुसते ध्वनी, नुसते नाद हेही अनुभूतीचे अर्थाचे वाहक असतात. आणि म्हणूनच अनेकदा कवी आपल्या कवितेत त्यांचाही कळत नकळत उपयोग करीत असतो. उदा. कविवर्य भा.रा. तांबे यांची अतिपरिचित ओळ पाहिली तर ''डुमडुमत डमरू ये'' या ओळीत 'ड' आणि 'म' या वर्णाची एका आड एक अशी आवृत्ती आहे. उच्चारणाच्या दृष्टीने 'ड' हा ध्वनी ताडित ध्वनी आहे. पुन्हा तो सघोषही आहे. त्याच्या पुढे येणारा 'म' हाही सघोष आहे. त्यामुळे मुळात कंपनयुक्त असणाऱ्या या ध्वनींची आवृत्ती साधून कंपनसंख्या आणखी वाढवली आहे. त्याच्या एका आड एक येण्याने आपोआप डमरू ध्वनीच उत्पन्न होतो. पण हे प्रत्यक्ष ध्वन्यानुकारी शब्दांबाबत आहे. जेथे शब्द ध्वन्यानुकारी नसतात तेथेही कवी त्यांच्या ध्वनींचा उपयोग करून घेताना दिसतो. त्या त्या शब्दांमुळे निर्माण होणारी ध्वनीवलये अपेक्षित परिणाम साधू शकतील, अशीच रचाना कवीकडून होते. उदा. 'रण काय भयानक लोळे आग जळात, आदळती, वळती, आवळती क्रोधात' पहिल्या ओळीतून दोन तुल्यबळ शक्तींचा पराकोटीचा संघर्ष सुरू होतो, हे कळते. तर दुसऱ्या ओळीतील ध्वनीकल्लोळामुळे, ध्वनींच्या आवर्तनामुळे त्या दोन शक्तीतला हा संघर्ष त्यातील चढउतारासह आपणास कळतो. अंती येणारे ध्वनी समान असणारी क्रियापदे एकापुढे एक याप्रमाणे आल्यामुळे हा परिणाम साधला गेला आहे. या विवेचनावरून एक गोष्ट लक्षात येते की, कवितेत अनेकदा दिसणाऱ्या शब्दासोबतच ऐकू येणारा श्शब्दही महत्वाचा असतो. कवितेच्या वाचकाला कविता ऐकू आली तर तिच्यातली अनुभूती खुलते, जाणवते, असेही काही कवितांच्या बाबतीत घडते. याचे प्रत्यक्ष उदाहरण म्हणजे बापट, करंदीकर, पाडगावकर यां कवींनी गायनाचे सार्वजनिक प्रयोग केले, त्याचप्रमाणे पु.ल. देशपांडे यांनी आरती प्रभू व बोरकर यांच्या कवितांच्या गायनाचे प्रयोग केले. त्यावेळी त्यांनी कोणकोणत्या कविता निवडल्या यावरून त्यांनी शब्दांच्या उच्चारणाला दिलेले महत्त्व लक्षात येईल.

कवितेच्या अध्यापनात मात्र अध्यापकाने एक भान सतत ठेवावयास हवे की आपण कोणतीही अध्यापन पद्धती किंवा समीक्षा पद्धती स्वीकारली तरीही अस्सल कविता पूर्णांशाने उलगडली जाईल या भ्रमात अध्यापकाने राहू नये. याबाबत रॉबर्ट पेन यांनी सांगितलेली बोधकथा लक्षात घेण्यासारखी आहे. त्याने कवितेची तुलना 'ऑरिलो' नावाच्या राक्षसाशी केलेली आहे. या राक्षसाचे वैशिष्टय म्हणजे तलवारीचा घाव घालून त्याचा एखादा अवयव तोडला तरी तो लगेच त्याच्या शरिराला पुन्हा चिकटायचा. आणि त्याचे पारिपत्य करणे कठीण जायचे. कविता या राक्षसापेक्षाही व्यापक आहे. तिला कह्यात आणणे खरोखर कठीण आहे. एखाद्या समीक्षकाने मला कविता समजलेली आहे आणि मी तिला पूर्णपणे समजावून सांगू शकतो. तिचा कोणताच पैलू आत माझ्या ज्ञानकक्षेबाहेर नाही, असे म्हटले तरी पुन्हा अवयव चिकटणाऱ्या 'ऑरिला' राक्षसाप्रमाणे तिच्यात नविन अर्थ सापडतच जाईल. यावर डॉ. म.सु. पाटील म्हणतात, 'या राक्षसाचा निकाल लावण्याचा एकच मार्ग असा आहे की, त्याला तुम्ही खाल्ले पाहिजे. त्याची हाडे, रक्त मांस काहीही शिल्लक ठेवता कामा नये. आणि तरीही त्यामुळे तो राक्षस मरतो असे नाही. तो तुमच्यात जगतो तुमच्याशी एकजीव होतो आणि त्याला खाल्ल्यामूळे तुम्ही स्वत:चे वेगळे, काहिसे राक्षसी होता. अशा प्रकारे जिंकत असतो तो राक्षसच. समीक्षक जिंकत नसतो. त्याला जिंकायचेही नसते. त्याला माहित असते की, कवितेच्या संदर्भातील आपले स्थान गौण आहे. तिची अद्भूत शक्ती प्रकट करण्याची संधी तिला देणे एवढेच त्याला अपेक्षित असते.'[३]

अशा प्रकारे कवीची काव्यदृष्टी, त्याची जीवनदृष्टी, त्याच्या अनुभवविश्वाचे स्वरुप यांचा अभ्यास करून जो अध्यापक आपली अध्यापनाची शैली निर्धारित करतो, तोच खरा 'मराठी साहित्याचा अध्यापक' असे म्हटले पाहिजे.

## निष्कर्ष :—

१ साहित्याच्या अध्यापनात विद्यार्थ्यांच्या अंत:करणप्रवृत्ती व सवेदनशीलता जागृत करणे महत्त्वाचे असते.

२ अध्यापनकार्यात विद्यार्थ्यांच्या पातळीवर पोहोचणे हे अध्यापकाचे अंतिम उद्दीष्ट असते. त्यासाठी विद्यार्थ्यांचेही व्यक्तिमत्त्व अध्यापकास लक्षात घ्यावे लागते.

३ पदवी किंवा पदव्योत्तर अशा दोन्ही स्तरावर अध्यापन करताना कवितेचे भाषेच्या दृष्टीने इतर साहित्यप्रकारांपसून असलेले वेगळेपण समजून घेण्याची आणि कवितेतून प्रकटणारी 'कवीच्छा' समजून घेण्याची काही कौशल्ये अध्यापकाला शिकविणे आवश्यक आहे.

४ काव्यभाषेचे वेगळेपण, तिच्यातील अर्थप्रवाहीपणा यांचा योग्य तो समन्वय साधून अध्यापक अध्यापन करेल तर ते नक्कीच प्रभावी ठरेल.

५ कवितेचे अध्यापन करताना अध्यापकाने नवनविन प्रयोग करून अध्यापनात रंजकता आणली पाहिजे. अशा प्रयोगशीलतेमुळे विद्यार्थ्याला शब्दशक्तीचे विविधप्रकारे ज्ञान मिळू शकते.

६ कवितेत अनेकदा दिसणाऱ्या शब्दासोबतच ऐकू येणारा शब्दही महत्वाचा असतो. कवितेच्या वाचकाला कविता ऐकू आली तर तिच्यातली अनुभूती अधिक खुलते.

संदर्भ :


१ जोशी डॉ. सुरेश, स्तरभेदाची संकल्पना, 'वाङ्मयाचे अध्यापन' संपा. डॉ. वा.पु. गिंडे, डॉ. द.दि.पुंडे, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे १९९४, पृ. २९—३०

२ ढवळे, वि.ना., प्रास्ताविक, 'साहित्याचे तत्वज्ञान', कॉन्टिनेन्टल प्रकाशन आणि मराठी तत्वज्ञान महाकोश मंडळ, पुणे, द्वितीयावृत्ती, २०१७ पृ. ९

३ पाटील डॉ.म.सु., भावकाव्य : स्वरुप आणि अध्यापन, 'वाङ्मयाचे अध्यापन' संपा. डॉ. वा.पु. गिंडे, डॉ. द.दि.पुंडे, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे १९९४ पृ. ७७


## संदर्भग्रंथ :—


१ कुलकर्णी वा.ल. 'साहित्य:स्वरुप आणि समीक्षा, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई १९७५

२ रेगे पु.शि., 'छांदसी', मौज प्रकाशन

३ खांडेकर वि.स., 'पारिजात', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, १९५२

४ जोशी सुधा, 'साहित्य : अध्यापन आणि प्रकार, संपा. श्री.पु.भागवत, सुधीर रसाळ, मौज प्रकाशन मुंबई १९८७



Published Details:
Marathiche adhyapan ani Kaviteche Adhyapan Kaushalya, Vidyawarta, Beed, ISSN 2319-9318, Mar. 2018 Spl. Issue, Impact Factor 4.014, pp. 47-48, UGC approved Sr. No. 62759, Proceedings for National Seminar on Teaching Methodology on 28th Mar. 2018 by Shivshakti Art, Comm. College, Babhulgaon
Available at SSRN: https://ssrn.com/abstract=4287398